# बीडीडी चाळींतील पोलिसांना मालकीची घरे मिळणार! अभिनंदन!!

# हाच न्याय पोलीस वसाहती व सरकारी कर्मचाऱ्यांनाही दिलाच पाहिजे

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडे<br>कृत

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरळी बीडीडी चाळींत गेली ३० वर्षे राहणाऱ्या पोलीस कुटुंबांना पुनर्विकासानंतर तीच घरे मालकी हक्काने देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे या पोलीस कुटुंबांची चिंता मिटली आहे. खोली राखण्यासाठी पुढील पिढीने पोलीस खात्यातच रूजू व्हायचे हे बंधन निदान या २९५० कुटुंबांना राहणार नाही. पुनर्विकास झाल्यावर त्यांना मुंबईत मालकी हक्काची ५०० चौरस फुटांची घरे मिळणार आहेत. ही कुटुंबे गेली ३० वर्षे त्याच घरात वास्तव्यास असल्याने त्यांच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला. आता याच निकषाने पोलीस वसाहतीत तीन पिढ्या राहणारी पोलीस कुटुंबे आणि सरकारी कर्मचारी वसाहतीत राहणारे सरकारी कर्मचारी यांनाही ते राहतात त्या वसाहतींचा पुनर्विकास करून मालकी हक्काची घरे देण्याचा निर्णय झाला पाहिजे. सर्वांना एकच निकष लावणे हाच न्याय आहे. एका गटाला सहानुभूती आणि इतरांना ठेंगा ही भूमिका सरकारने घेतली तर ती अन्यायी भूमिका ठरेल आणि असा अन्याय पोलिसांनी व सरकारी कर्मचाऱ्यांनी सहन करता कामा नये.

बीडीडी चाळींतील पोलीस कुटुंबांना मालकीची घरे दिली त्याप्रमाणे आम्हालाही द्या यासाठी पोलीस व सरकारी कर्मचाऱ्यांनी लढले पाहिजे. जर पोलिसांना रस्त्यावर येऊन लढता येत नसेल तर त्यांनी न्यायालयात दाद मागावी. सरकारने ही न्याय्य मागणी मान्य केली नाही तर त्याचा सरळ अर्थ असा होतो की, सरकारने निवडणुकीवर डोळा ठेवून बीडीडी चाळींचा निर्णय घेतला आहे. पोलीस कुटुंबांबद्दल सहानुभूती वाटून हा निर्णय झालेला नाही. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे घोंगडे भिजत पडले आहे. या पुनर्विकासाच्या भूमिपूजनाचा नारळ वाढविला, पण पुढे काहीच झाले नाही हा प्रचार बाधक ठरेल म्हणून या पुनर्विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी हे निर्णय घेतले, असेही म्हणता येईल. पण निर्णय कोणत्या हेतूने घेतला हा विषय बाजूला ठेवून आम्ही इतकीच मागणी करतो की, सरकारने विचारपूर्वक घेतलेला हा निर्णय सर्वांनाच लागू करावा.

बीडीडी चाळींतील ज्या इमारतींत पोलीस कुटुंबे राहतात, त्या इमारती गृह विभागाच्या ताब्यात आहेत. पोलिसांना ही घरे सेवा निवासस्थाने म्हणून दिलेली आहेत. म्हणजेच सेवा संपून निवृत्त झाल्यावर निवासस्थान सोडावे लागते. या निवासस्थानापोटी प्रत्येकाच्या पगारातून ३ ते ४ हजार रुपये महिना कापले जातात. गेली ३० वर्षे हेच नियम लागू आहेत. इतर पोलीस वसाहती आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत हीच प्रणाली आहे. मग बीडीडी चाळींतील इमारतींचा पुनर्विकास होऊन तेथील पोलीस कुटुंबांना मालकी हक्काची ५०० चौरस फुटांची घरे दिली जाणार असतील तर बाकीच्यांनाही हाच निर्णय लागू झाला पाहिजे.

केवळ बीडीडी चाळींपुरता हा निर्णय घेतला असे म्हणण्याची संधी सरकारला देऊ नका. ही चेतावणी देण्याचे कारण म्हणजे याआधी असाच प्रकार घडला आहे. ताडदेव परिसरातील काही इमारतींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय झाला. या इमारतींत जवळजवळ ७०० सफाई कामगारांची सेवा निवासस्थाने होती. त्यांनी स्पष्ट सांगितले की, आमची निवासस्थाने आम्हाला मालकी हक्काने दिली तरच आम्ही पुनर्विकास होऊ देऊ नाहीतर पुनर्विकास होऊ देणार नाही. ७०० सफाई कामगार कुटुंबे आक्रमक झाली आणि पुनर्विकास अडला. यानंतर खूप आंदोलने झाली. अखेरीस सफाई कामगारांची मागणी मान्य होऊन या ७०० कुटुंबांना पुनर्विकासानंतर सेवा निवासस्थान म्हणून घर न देता मालकी हक्काने घर देण्याचा निर्णय झाला. हा निर्णय झाल्यानंतर सफाई कामगारांच्या सर्व वसाहतींत हाच निर्णय लागू करून त्यांना मालकीची घरे मिळायला हवी होती. मात्र सर्वांना ही जाणीव होण्यापूर्वी सरकारने (काँग्रेस-राष्ट्रवादी) वेगाने पावले टाकीत शासन निर्णय केला की, सफाई कामगारांना पुनर्विकासानंतर मालकी हक्काने घरे देण्याचा निर्णय हा फक्त ताडदेवच्या प्रकल्पापुरता मर्यादित आहे. हा फॉर्म्युला इतर कुठेही अंमलात आणला जाणार नाही.

यावेळी हेच होण्याची शक्यता आहे. बीडीडी चाळींतील पोलीस कुटुंबांना जो नियम लावला, तो सर्वांना लागू झाला पाहिजे. पण सरकार यात खोडा घालेल आणि इतरांना वंचित ठेवेल. हा अन्याय होता कामा नये. सेवाशर्तीची घरे मालकी हक्काने द्यावी की नाही हा वेगळा विषय आहे. पण सरकारने एका गटासाठी निर्णय घेतला तर सर्वांसाठी तोच निर्णय हवा हाच न्याय होईल.